| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | ०३/०६/२०१७ |
| नोंदणी दिनांक | : | ०३/०६/२०१७ |
| निकाल दिनांक | : | ०७/०८/२०२६ |
| कालावधी | : | **वर्षे महिने दिवस** |
| | | **०९ ०२ ०४** |

**<u>नियमीत फौजदारी खटला क्र. ४४/२०१७ मधील न्यायनिर्णय</u>**

**(निशाणी क्र. ७०)**

**फौजदारी नियमावलीचे प्रकरण XXXIII मधील नमुना क्र.XXXII प्रमाणे**

**भाग–'अ'**

**(न्यायनिर्णयाचे मुखपृष्ठ)**

[फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (I)]

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, औंढा नागनाथ यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी श्री. आदित्य घ. नाईक)**

**निकाल तारीख ०७/०८/२०२६**

**नियमित फौजदारी खटला क्र. ४४/२०१७**

**सीएनआर क्र. एमएचएचआय ०८०००२४०२०१७**

**(अपराध क्र. ९३/२०१६, हट्टा पोलीस ठाणे)**

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | महाराष्ट्र राज्य,<br>तर्फे प्रभारी अधिकारी,<br>हट्टा पोलीस ठाणे,<br>जि. हिंगोली. |
| **सरकार तर्फे विद्वान वकील** | | सहा.सरकारी अभियोक्ता श्री. पी. यु. माने. |

| | | |
|---|---|---|
| **आरोपी** | | १. रामप्रसाद सौंदाजी दराडे,<br>वय–३५ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>२. गंगाधर सौंदाजी दराडे,<br>वय–३० वर्षे, व्यवसाय– शेती,<br>३. कैलास सौंदाजी दराडे,<br>वय–४५ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>४. सौंदाजी सखाराम दराडे **(मयत)**,<br>वय–७० वर्षे, व्यवसाय– शेती,<br>५. गोपीनाथ कैलास दराडे,<br>वय– १९ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>६. उर्मिलाबाई गंगाधर दराडे,<br>वय– २६, व्यवसाय– घरकाम,<br>सर्व रा. अंजनवाडी, ता. औंढा नागनाथ,<br>जि. हिंगोली. |
| **आरोपींतर्फे विद्वान वकील** | | ॲड. श्री. एम. व्ही. मगर. |

**भाग–'ब'**

[फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii)]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०५/११/२०१६ |
| प्रथम खबर अहवालाचा दिनांक | १२/११/२०१६ |
| दोषारोप–पत्र दाखल झाल्याचा दिनांक | ०३/०६/२०१७ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | २६/०३/२०१८ |
| पुरावा आरंभ झाल्याचा दिनांक | ०५/०८/२०२६ |
| प्रकरण न्यायनिर्णयाकरीता राखुन ठेवल्याचा दिनांक | ०७/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०७/०८/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक, असल्यास | — |

## आरोपींचा तपशील

| अ. क्र. | आरोपींची नांवे | आरोपींना अटक केल्याचा दिनांक | आरोपींना जमानतीवर सोडल्याचा दिनांक | दोषारोपामधील कलमे | दोषमुक्ती किंवा दोषसिद्धी | देण्यात आले ली शिक्षा | फौ.प्र.सं. चे कलम ४२८ करीता आरोपीने भोगलेल्या स्थानबद्धतेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रामप्रसाद सौंदाजी दराडे | दि. १४/१२/२०१६ | दि. १४/१२/२०१६ | भा.दं.वि. कलम १४३, १४७, ३२३, ४४७, ५०४ सह कलम १४९ अन्वये | निर्दोष मुक्त | — | — |
| २. | गंगाधर सौंदाजी दराडे | दि. १४/१२/२०१६ | दि. १४/१२/२०१६ | भा.दं.वि. कलम १४३, १४७, ३२३, ४४७, ५०४ सह कलम १४९ अन्वये | निर्दोष मुक्त | — | — |
| ३. | कैलास सौंदाजी दराडे | दि. १४/१२/२०१६ | दि. १४/१२/२०१६ | भा.दं.वि. कलम १४३, १४७, ३२३, ४४७, ५०४ सह कलम १४९ | निर्दोष मुक्त | — | — |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अन्वये | | | |
| ४. | सौंदाजी सखाराम दराडे **(मयत)** | दि. १४/१२/२०१६ | दि. १४/१२/२०१६ | भा.दं.वि. कलम १४३, १४७, ३२३, ४४७, ५०४ सह कलम १४९ अन्वये | निर्दोष मुक्त | – | – |
| ५. | गोपीनाथ कैलास दराडे | दि. १४/१२/२०१६ | दि. १४/१२/२०१६ | भा.दं.वि. कलम १४३, १४७, ३२३, ४४७, ५०४ सह कलम १४९ अन्वये | | | |
| ६. | उर्मिलाबाई गंगाधर दराडे | दि. १४/१२/२०१६ | दि. १४/१२/२०१६ | भा.दं.वि. कलम १४३, १४७, ३२३, ४४७, ५०४ सह कलम १४९ अन्वये | | | |

**भाग–'क'**

[फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii)]

**<u>अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी</u>**

**अ) <u>अभियोग पक्ष</u> :–**

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | दिपक नामदेव दराडे | फिर्यादी तथा जखमी | ६१ |
| २. | पांडुरंग नामदेव दराडे | जखमी साक्षीदार | ६३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | मुक्ताबाई नामदेव दराडे | जखमी साक्षीदार | ६४ |

ब) <u>बचाव पक्ष, असल्यास</u> :–

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

क) <u>न्यायालयीन साक्षीदार, असल्यास</u> :–

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

**<u>अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन कागदपत्रांची/निशाणींची यादी</u>**

अ) <u>अभियोग पक्ष</u> :–

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | ६२ | फिर्यादीवरील फिर्यादीची सही |
| २. | ६५ | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | ६६ ते ६८ | जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्रे |

ब) <u>बचाव पक्ष</u> :–

| अ.क्र. | निशाणी क्र. | तपशिल |
|---|---|---|
| – | – | – |

क) <u>न्यायालयीन</u> :–

| अ.क्र. | निशाणी क्र. | तपशिल |
|---|---|---|
| – | – | – |

ड) <u>भौतिक वस्तु</u> :–

| अ.क्र. | भौतिक वस्तु क्र. | तपशिल |
|---|---|---|
| – | – | – |

## न्यायनिर्णय

(पारित दिनांकः– ०७/०८/२०२६)

प्रस्तुत खटल्याचे कामी आरोपींनी भारतीय दंड विधान संहिता कलम १४३, १४७, ३२३, ४४७, ५०४ सह कलम १४९ प्रमाणे शिक्षेस पात्र असणाऱ्या अपराधांकरीता संपरीक्षेचा सामना केलेला आहे.

०२. अभियोग पक्षाची हकिकत थोडक्यात अशी की, दिनांक ०५/११/२०१६ रोजी सकाळी १०:०० वाजताचे सुमारास फिर्यादी व त्याचे घरचे सर्वजण घरी असतांना त्यांच्या गावातील आरोपी क्र.१ ते ६ हे त्यांचे घरासमोर अंगणात आले. रामप्रसाद दराडे हा फिर्यादीला विनाकारण शिवीगाळ करू लागला. त्यावेळी फिर्यादी त्यास म्हणाला की, ‘तु मला विनाकारण शिवीगाळ का करतोस'. असे त्याने म्हणताच रामप्रसाद दराडे याने त्याचे हातातील काठीने फिर्यादीचे उजव्या खांद्यावर व उजव्या पायाचे गुडघ्यावर मारले. त्यामुळे फिर्यादीच्या खांद्याला व पायाला सुज आली. त्यावेळी फिर्यादीचे आई, वडील, भाऊ व वहिनी हे तेथे आले. त्यावेळी गंगाधर दराडे याने फिर्यादीचे वडील नामदेवराव यांना लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच फिर्यादीची आई मुक्ताबाई हिस उर्मिलाबाई दराडे हिने

लाथाबुक्यांनी मारहण केली. तसेच फिर्यादीचा भाऊ पांडुरंग दराडे यास सौंदाजी दराडे याने लाथांनी मारहाण केली. तसेच माझी वहिनी स्वाती दराडे हिस कैलास दराडे याने लाथांनी मारहण केली. त्यानंतर गोपीनाथ दराडे याने फिर्यादीला थापडांनी मारहाण करून ढकलून दिल्याने फिर्यादी खाली पडला व त्याचे डोक्यास मार लागुन खरचटल्याने रक्त निघाले. सदरचे भांडण गजानन नागरे, उत्तम नागोराव व ईतर लोकांनी प्रत्यक्ष पाहुन सोडवासोडव केली. सदरच्या भांडणात फिर्यादीच्या आई व वहिनी यांचे मंगळसुत्र प्रत्येकी ०५ ग्रॅम वजनाचे ते भांडणात हरवले. फिर्यादी व त्याच्या घरच्यांना मारहाण झाल्याने सदर प्रकाराबाबत फिर्यादीने आरोपींविरुध्द फिर्याद दाखल केली.

०३. घटनेची खबर प्राप्त होताच ठाणे अंमलदार, हट्टा पोलीस ठाणे यांनी आरोपींविरुध्द गुन्हा रजि. क्र. ९३/२०१६ नुसार गुन्हा दाखल केला. सदर गुन्ह्याचा तपास करते समयी तपासी अधिकारी यांनी तपासादरम्यान प्रामुख्याने घटनास्थळ पंचनामा केला. तसेच फिर्यादीचे व जखमींचे दुखापतीचे वैदयकीय प्रमाणपत्रे प्राप्त केले. साक्षीदारांची तपास टिपणे नोंदविली. आरोपींना अटक केली. गुन्ह्यातील काठी जप्त केली. तपासाअंती आरोपींविरुध्द पुरावा मिळून आल्याने त्यांचे विरुद्ध न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल केले.

०४. माझे पूर्व पीठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द नि.क्र.२८ अन्वये दोषारोप ठेवला. आरोपींना दोषारोप वाचून दाखवून तो मराठी भाषेमधून समजावून सांगण्यात आला. आरोपींनी दोषारोप केलेले अपराध नाकबूल करुन, आपली संपरिक्षा केली जावी अशी मागणी केली.

०५. खटला न्यायनिर्णीत करीत असताना माझ्या विचाराधीन आलेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष, मी त्याखालील नमूद कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे नोंदवित आहे :–

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| (१) | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक ०५/११/२०१६ रोजी सकाळी १०:०० वाजेच्या सुमारास मौजे अंजनवाडी, ता. औंढा नागनाथ येथे फिर्यादी दिपक नामदेव दराडे यांचे राहते घरासमोर, आरोपींनी गैरकायदयाची मंडळी जमवुन बेकायदा जमाव करुन त्याचा घटक बनले व त्यायोगे त्यांनी भा.दं.वि.सं. कलम १४३ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केलेला आहे ? | नाही. |
| (२) | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो का की, वर नमूद कालावधीदरम्यान व ठिकाणी आरोपींनी संगनमताने बेकायदेशीर जमाव जमवुन, सामाईक उद्दीष्ट साधण्यासाठी बलप्रयोग किंवा हिंसाचार करून दंगा केला व त्यायोगे त्यांनी भा.दं.वि.सं. कलम १४७ सह कलम १४९ अन्वये शिक्षेस पात्र असणारा अपराध केलेला आहे हे म्हणणे खरे आहे की, | नाही. |
| (३) | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो का की, वर नमूद कालावधीदरम्यान व ठिकाणी आरोपींनी, सामाईक उद्दीष्ट साधण्यासाठी, फिर्यादी व ईतर साक्षीदार यांना मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व त्यायोगे त्यांनी भा.दं.वि.सं. कलम ३२३ सहकलम १४९ अन्वये शिक्षेस पात्र असणारा अपराध केलेला आहे ? | नाही. |
| (४) | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो का की, वर नमूद कालावधीदरम्यान व ठिकाणी आरोपींनी, सामाईक उद्दीष्ट साधण्यासाठी, फिर्यादीच्या घरात गैरकायदेशीर रित्या गृहअतिक्रमण केले व | |

त्यायोगे त्यांनी भा.दं.वि.सं. कलम ४४७ सहकलम १४९ अन्वये शिक्षेस पात्र असणारा अपराध केलेला आहे ?

| | | |
|---|---|---|
| (५) | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो का की, वर नमूद कालावधीदरम्यान व ठिकाणी आरोपींनी, सामाईक उद्दीष्ट साधण्यासाठी, फिर्यादीचा व ईतर साक्षीदार यांचा अपमान करून त्यांना प्रक्षोभित केले आणि तशा प्रक्षोभामुळे त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असा त्यामागे त्यांचा उद्देश होता किंवा तसे होण्याचा संभव असल्याची त्यांना जाणीव होती व त्यायोगे त्यांनी भा.दं.वि.सं. कलम ५०४ सहकलम १४९ अन्वये शिक्षेस पात्र असणारा अपराध केलेला आहे ? | नाही. |
| (६) | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## – <u>कारणमिमांसा</u> –

०६. अभियोग पक्ष हा भाग–'क' मध्ये नमुद केल्याप्रमाणे तोंडी व कागदोपत्री असलेल्या पुराव्यावर अवलंबुन राहीला आहे. याउलट, आरोपींनी मात्र त्यांच्या बचावार्थ कोणताही पुरावा सादर केलेला नाही. संपरिक्षेदरम्यान आरोपींविरुध्द कोणताही पुरावा न आल्याने त्यांचे फौ.प्र.सं. कलम ३१३ (१)(ब) प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आलेले नाही.

०७. अभियोग पक्षातर्फे विव्दान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. पी. यु. माने यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच आरोपींकरीता विव्दान विधीज्ञ श्री. एम. व्ही. मगर यांचा युक्तीवाद ऐकला.

<u>**मुद्दे क्र.१ ते ५ करीता**</u> –

०८. वरील पाचही मुद्दे हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे, मी त्यांचे बाबत एकत्रीत विवेचन करून त्याप्रमाणे कारणमिमांसा देत आहे.

०९. प्रस्तुत खटल्याचे कामी फिर्यादी (सा.क्र.१), पांडुरंग (सा.क्र.२) व मुक्ताबाई (सा.क्र.३) हे महत्वाचे साक्षीदार अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले आहेत. अभियोग पक्षाच्या हकिकतीनुसार, दिनांक ०५/११/२०१६ रोजी आरोपी यांनी संगनमताने बेकायदेशीर जमाव जमवुन दंगा केला, गृहअतिक्रमण केले व फिर्यादी आणि ईतर जखमी साक्षीदारांना मारहाण व शिवीगाळ केली. परंतु, फिर्यादी (सा.क्र.१), पांडुरंग (सा.क्र.२) व मुक्ताबाई (सा.क्र.३) यांनी त्यांच्या सरतपासादरम्यान अभियोग पक्षाच्या हकिकतीस पूरक अशी साक्ष दिलेली नाही. वरील साक्षीदार हे अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने विद्वान सहा.सरकारी अभियोक्ता यांचेकडून न्यायालयाच्या परवानगीने त्यांना उलटतपासास्वरुप प्रश्न विचारण्यात आले. परंतु, त्यायोगे देखील अभियोग पक्षाच्या हकिकतीस पुष्टी देणारा कोणताही पुरेसा असा पुरावा अभियोग पक्षाला आरोपींचे विरुद्ध अभिलेखावर आणता आलेला नाही. अभियोग पक्षाच्या हकिकतीनुसार घटना घडली असल्याबाबत वरील साक्षीदारांना सूचित केले असता, त्यांनी ते स्पष्टपणे नाकारले आहे. त्याकारणे, फिर्यादी (सा.क्र.१), पांडुरंग (सा.क्र.२) व मुक्ताबाई (सा.क्र.३) यांचा तोंडी पुरावा हा आरोप सिध्द करण्याकरीता पुरेसा व विश्वसनीय आहे असे म्हणता येणार नाही. प्रस्तुत प्रकरणी, घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.६५) व वैद्यकीय प्रमाणपत्रे (नि.क्र. ६६ ते ६८) आरोपींमार्फत मान्य करण्यात आलेले आहेत. परंतु, केवळ सदर कागदोपत्री पुरावा हा आरोपींनी कथीत अपराध केलेला आहे, हे सिद्ध करण्याकरीता पुरेसा नाही. याठिकाणी हे देखील नमुद करणे आवश्यक ठरते की, गुन्ह्यातील पिडीत व आरोपी यांनी त्यांच्या दरम्यान तडजोड झाली असल्याबाबतची पुरसीस (नि.क्र.६०) कडे सादर केलेली आहे.

१०. न्यायालयासमोर अभिलेखावर आलेल्या उपरोक्त पुराव्याचा व इतर नमूद बाबींचा विचारकरीता, आरोपींनी दोषारोप केलेले अपराध केल्याचे सबळ, पुरेश्या व

विश्वसनीय अशा पुराव्याद्वारे कोणत्याही वाजवी शंकेपलीकडे जाऊन सिद्ध करण्यामध्ये अभियोग पक्ष अयशस्वी ठरलेला आहे. करिता, मी मुद्दे क्र.१ ते ५ यांचेबाबत नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

## मुद्दा क्र.६ करीता :–

११. वर म्हणल्याप्रमाणे अभियोग पक्ष, आरोपींचे विरुद्ध भारतीय दंड विधान संहिता कलम १४३, १४७, ३२३, ४४७, ५०४ सह कलम १४९ अन्वये निश्चित केलेले दोषारोप विश्वसनीय व पुरेशा अशा पुराव्याद्वारे कोणत्याही वाजवी शंकेपलीकडे जावून सिद्ध करण्यात अयशस्वी ठरला आहे. तसेच, त्यांनी इतरही कोणता अपराध केल्याचे अभिलेखावरील पुराव्यावरून सिद्ध होत नाही. त्यामुळे आरोपींना संशयाचा फायदा देवून त्यांना निर्दोष मुक्त करणे हे न्यायोचित ठरणारे आहे. तसेच, अपिलाकरीताचा कालावधी संपल्यानंतर प्रस्तुत गुन्ह्यातील मुद्देमाल म्हणजेच एक वेळुची काठी नियमानुसार नाश करणे योग्य होणारे आहे. सबब, वरील चर्चेअंती मुद्दा क्र.६ चे उत्तरादाखल खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो :–

## आदेश

१) आरोपी क्र. १ रामप्रसाद सौंदाजी दराडे, आरोपी क्र. २ गंगाधर सोंदाजी दराडे, आरोपी क्र. ३ कैलास सौंदाजी दराडे, आरोपी क्र. ५ गोपीनाथ कैलास दराडे, आरोपी क्र. ६ उर्मिलाबाई गंगाधर दराडे यांची भारतीय दंड विधान संहिता कलम १४३, १४७, ३२३, ४४७, ५०४ सह कलम १४९ अन्वये शिक्षेस पात्र असणाऱ्या अपराधांमधून, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपींचे वैयक्तिक मुचलके व जामीन बंधपत्रे रद्द करण्यात येतात.

३) अपिला करीताचा कालावधी संपल्यानंतर प्रस्तुत गुन्ह्यातील मुद्देमाल म्हणजेच एक वेळुची काठी नियमानुसार नाश करण्यात यावी.

३) आरोपींनी, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) अन्वये, प्रत्येकी रुपये १५,०००/– (रक्कम रुपये पंधरा हजार) इतक्या रक्कमेचा वैयक्तिक मुचलके व तेवढ्याच रकमेचे जामिन द्यावेत.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषित केला.)

ADITYA GHANSHAM NAIK
Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2026.08.07 16:34:47 +0530

स्थळ : औंढा नागनाथ (श्री. आदित्य घ. नाईक)
दिनांक : ०७/०८/२०२६ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, औंढा नागनाथ

**प्रमाणपत्र**

मी, खात्रीपूर्वक कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे/न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – | एम. एस. कुलकर्णी, लघुलेखक (श्रेणी–३) |
| न्यायालयाचे नांव | – | दिवाणी व फौजदारी न्यायालय, औंढा नागनाथ. |
| दिनांक | – | ०७.०८.२०२६ |

सही/–

लघुलेखक श्रेणी–३